महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

**शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि १**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक :- १५ जून, २०१३**

**वाचा :-**

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक १ दिनांक ०४ जानेवारी, २०१३

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६ दिनांक १९ जानेवारी, २०१३

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३

४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३

५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५७, ५८ व ५९ दिनांक २० एप्रिल, २०१३

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र २००९ / (६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२

**प्रस्तावना -**

राज्यातील सर्व शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व नवीन



Principal
Chaitanya International School
CBSE 1130899
A/P- Indori, Tal-Maval, Dist-Pune

खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देताना हेतुपत्र (Letter of Intent) व **शाळा मान्यता प्रमाणपत्र** (Letter Of Approval) ची पध्दती स्वीकारावी असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने CBSE, ICSE इत्यादी बोर्डाच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

२. कायम विना अनुदान तत्वावर नवीन खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे यासाठी शासनाने सन २०१३ मध्ये **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** पारित केला असून त्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात आलेली आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त ७,१०८ अर्जाची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ अर्जांना पात्र करण्यात आलेले आहे. या पात्र प्रस्तावावर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय -**

(१) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ७१०८ प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे २४१७ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण प्राप्त प्रस्ताव | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | ६,१२१ | १,९७७ | ४,१४४ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ९८७ | ४४० | ५४७ |
| | एकूण | ७,१०८ | २,४१७ | ४,६९१ |

Principal
Chaitanya International School
CBSE 1130899
A/P- Indori, Tal-Maval, Dist-Pune

(२) **शाळा दर्जावाढीच्या ४४० पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबतची परवानगी** देण्यात येत आहे.

(३) **नवीन शाळांचे प्रस्ताव** - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या १२७७ नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार** अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उपरोक्त संबधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापनांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित सक्षम अधिका-यांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(४) **पूर्व प्राथमिक** शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता १ली पासून परवानगी देण्यात येईल.

(५) **संस्थेने** परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

Kuldeep/Marathi/G.R. Self Finance 13 06 2013

Principal
Chaitanya International School
CBSE 1130899
A/P- Indori,Tal-Maval, Dist-Pune

(६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील त्याचप्रमाणे महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिरित्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

(८) सोबतच्या विवरपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबातची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन / दर्जावाढ प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. 201306151740421921 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश ठुबे)

सहसचिव, महाराष्ट्र शासन

Principal
Chaitanya International School
CBSE 1130899
A/P- Indori, Tal-Maval, Dist-Pune

प्रति,

शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

महाराष्ट्र शासन
विवरणपत्र- १

## महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत कलम ७(१) अन्वये नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी दिलेल्या शाळांच्या नावाची यादी

शासन निर्णय क्र.-स्वयंअ २०१३/(८५/१३)/मशि-१ चे सहपत्र

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पता | माध्यम | नवीन शाळा / दर्जा वाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| १ | मुंबई (उत्तर) | घाटकोपर शिक्षण प्रसारक मंडळ, पंतनगर, घाटकोपर (पू) मुंबई ७५. | ऋषीकुल विदयालय, पंतनगर, घाटकोपर (पू), मुंबई ७५ | इंग्रजी (S.S.C) | नवीन शाळा इ. १ ते ४ | पात्र | प्राथमिक |
| २ | मुंबई (उत्तर) | सोमय्या विदयाविहार ट्रस्ट विदयानगरी, घाटकोपर, मुंबई ४०० ०७७. | दि सोमय्या स्कूल विदयाविहार घाटकोपर (पू) | इंग्रजी (CBSE) | C.B.S.E नवीन शाळा इ. १ ते ४ | पात्र | प्राथमिक |
| ३ | मुंबई (उत्तर) | यशवंतराव चव्हाण शिक्षण प्रसारक मंडळ | सिंहगड स्प्रींग डाले प्रायमरी स्कूल, म्हाडा कॉलनी चांदिवली, मुंबई ४०० ०७२ | इंग्रजी (S.S.C) | नवीन शाळा इ. १ ते १०वी | पात्र | प्राथमिक |
| ४ | मुंबई (उत्तर) | केदारनाथ विदयाप्रसारिणी, नेहरुनगर, कुर्ला (पू), मुंबई ४०० ०२४. | स्वदेशी मराठी शाळा, व्ही. एन. पुरव मार्ग, चुनाभट्टी, कुर्ला (पू), मुंबई ४०० ०२२. | मराठी | दर्जावाढ इ. ८वी ते १०वी | पात्र | माध्यमिक |
| ५ | मुंबई (उत्तर) | वं. नाथ पै शिक्षण प्रसारक मंडळ, टागोरनगर, ग्रुप नं. ३, विक्रोळी (पू), मुंबई ४०० ०८३ | कमल वासुदेव वायकोळे इंग्लिश स्कूल, टागोरनगर, ग्रुप नं. ३, विक्रोळी (पू) | इंग्रजी (s.s.c) | दर्जावाढ इ. ८वी ते १०वी | पात्र | माध्यमिक |
| ६ | मुंबई (उत्तर) | स्वामी शिक्षण संस्था अॅन्ड वेल्फेअर सोसायटी, रोड नं. १०, बैंगणवाडी, शिवाजीनगर, गोवंडी, मु. ४३ | डॅफोडिल इंग्लिश स्कूल रोड नं. ८, प्लॉट नं. ६ए/१२३, बैंगणवाडी, गोवंडी | इंग्रजी (s.s.c) | दर्जावाढ इ. ८वी ते १०वी | पात्र | माध्यमिक |
| ७ | मुंबई (उत्तर) | इनफंट इंडिया ए ज्यु. सोसायटी १३/ए/७ शिवाजीनगर, गोवंडी, रोड नं. २, मुंबई ४०० ०४३. | बैत ऊल नसीब उर्दु गर्ल्स प्रायमरी स्कूल १३/ए/७ शिवाजीनगर, गोवंडी रोड नं. २ मुंबई | उर्दू | दर्जावाढ इ. ५वी ते ८वी | पात्र | माध्यमिक |
| ८ | मुंबई (उत्तर) | अंजुमन शाने इस्लाम एज्यु. सोसायटी हुसनिया मस्जिद खैरानी रोड, साकीनाका, मुंबई ७२. | अंजुमन शाने इस्लाम ज्यू. कॉलेज, खैरानी रोड, साकीनाका, मुंबई ७२. | इंग्रजी | दर्जावाढ इ. ११ वी व १२वी विज्ञान व वाणिज्य | पात्र | उच्च माधामिक |
| ९ | मुंबई (उत्तर) | विदयाधिराजा एज्यु. सोसा. २७/३ आनंदनगर, खंडेलवाल मार्ग, भांडुप(प), मुंबई ४०००७८ | विदयाधिराजा ज्युनिअर कॉलेज, ९० फीट रोड, भांडुप (पू), मुंबई. ४०० ०४२ | इंग्रजी | दर्जावाढ इ. ११ वी व १२वी विज्ञान व वाणिज्य | पात्र | उच्च माधामिक |

Principal
Chaitanya International School
CBSE 1130899
A/P- Indori, Tal-Maval, Dist Pune

3

| जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा / दर्जा वाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| पुणे | कै. उषाताई लोखंडे चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे, वैदुवाडी, पुणे-१६ | कै. उषाताई लोखंडे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित माध्यमिक विद्यालय, सांगिसे, ता.मावळ | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| पुणे | श्री दत्तकृपा शैक्ष. व कृषी ग्राम विकास प्रतिष्ठाण घारगाव ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर | श्री. आनंदराव जगताप इंग्लिश मेडियम स्कुल, मांडवगण फराटा ता. शिरुर जि.पुणे | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| पुणे | मावळ शिक्षण प्रतिष्ठान, तळेगांव दाभाडे, ता.मावळ | श्री पद्मावती विद्यामंदीर, उर्से, ता.मावळ, जि.पुणे | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| | नवयुग शिक्षण संस्था, दौंड, ता.दौंड | स्व.सुभाष बाबुराव कुल उच्च प्राथमिक शाळा, काळेवाडी (चौफुला), ता.दौंड | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| पुणे | म्हसोबा शिक्षण प्रसारक मंडळ निमगाव महाळुंगी ता. शिरुर जि.पुणे. | गुरुवर्य शंकरराव भुजबळ इंग्लिश मेडियम स्कुल शिरुर ता. शिरुर जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| पुणे | चैतन्य चॅरिटेबल फौंडेशन, इंदोरी, ता.मावळ, जि.पुणे | चैतन्य प्रबोधिनी इंग्लिश स्कूल, इंदोरी, ता.मावळ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| पुणे | मातोश्री शिक्षण संस्था, जरेवाडी, पो.गुळाणी, ता.खेडु | एस.एन.इंग्लिश मिडीयम स्कूल, राक्षेवाडी, ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| पुणे | कारभारी आण्णा चारि.फाऊंडेशन बारामती जि.पुणे. | कारभारी आण्णा चारि.फाऊंडेशन प्रायमरी स्कुल बारामती ता. बारामती जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| पुणे | श्री रामचंद्र एज्युकेशन सोसायटी, लोणीकंद, ता.हवेली | न्यु टाईम्स इंटरनॅशनल स्कूल, लोणीकंद, ता.हवेली | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| | मावळ विद्या प्रतिष्ठान, भागरवाडी, लोणावळा | दादा देशमुख मेमोरियल स्कूल, औंढे खुर्द, ता.मावळ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| पुणे | समर्थ ज्ञानपिठ ,सोमेश्वर ता. बारामती जि.पुणे | सह्याद्री पब्लिक स्कुल खंडोबाची वाडी ता. बारामती जि.पुणे.(आय.सी.एस.ई.) | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| पुणे | जोग एज्युकेशनल ट्रस्ट, शिवाजीनगर, पुणे-४ | जे.ई.टी.एस. स्कूल, मयुर कॉलनी, कोथरुड, पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| पुणे | गुरुकुल शैक्षणिक संस्था, धायरी, पुणे-४१ | गुरुकुल शैक्षणिक संस्था, धायरीगांव, पुणे-४१ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| पुणे | भारती विद्यापीठ | भारती विद्यापिठइंग्लिश मेडियम स्कुल (सी.बी.एस.ई.) लवळे ता. मुळशी जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| पुणे | अलार्ड चॅरिटेबल ट्रस्ट, अलंकार सिनेमा बिल्डिंग, पुणे-१ | अलार्ड पब्लिक स्कूल, स.नं.५०, मारुंजी, ता.मुळशी, जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |

Principal
Chaitanya International School
CBSE 1130899
A/P Indori, Tal-Maval, Dist-Pune

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र.१२३१/एसएम-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ३१ ऑक्टोबर, २०१८

**प्रस्तावना :-** चैतन्य चॅरिटेबल फौंडेशन,इंदोरी,ता.मावळ,जि.पुणे संचलित चैतन्य प्रबोधिनी इंग्लिश स्कुल,इंदोरी,ता.मावळ,जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत चैतन्य चॅरिटेबल फौंडेशन,इंदोरी,ता.मावळ,जि.पुणे संचलित चैतन्य प्रबोधिनी इंग्लिश स्कुल,इंदोरी,ता.मावळ,जि.पुणे या प्राथमिकला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता ६ वी ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, राज्यमंडळ) अशी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ करण्यासाठी खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ **अटी व शर्ती-**

१) सदर संस्थेने विहित मुदतीच्या व विहित निकषाच्या मुदतठेव पावतीच्या प्रती, सन २०१७-१८ चा लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती, विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. सदर कालावधीत पुर्तता न केल्यास शाळेची मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल.

२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३) संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करून सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी

Principal
Chaitanya International School
CBSE 1130899
A/P- Indori,Tal-Maval, Dist-Pune

आदेश [illegible] रद्दबातल करेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व [illegible] अधिनियम, कायदे/नियम तसेच, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा १) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(५) संबंधित [illegible] शिक्षणाधिकाऱ्यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करुन त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत [illegible] U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबावदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "<u>स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा</u>" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

H. S. Wadkar
Principal
Chaitanya International School
At Post Indori, Tal. Maval, Dist. Pune

३०/१०/२०१६

(रा.वि.कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे.
६. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक), पुणे.
७. निवडनस्ती (एसडी-२)

Principal
Chaitanya International School
CBSE 1130899
A/P- Indori,Tal-Maval, Dist-Pune

18

शिक्षण संचालनालय
(माध्यमिक व उच्च माध्यमिक),
महाराष्ट्र राज्य,
(मध्यवर्ती ईमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे ४११००१.
दूरध्वनी : (020)26126463
e-mail: doesecondary@gmail.com
website WWW.mahdoesecondary.com

२६ SEP 2018

क्र. अपाशा/स्वयंअर्थ/२०१८/१७-१८/३०१/ ८०९८
दिनांक- 26 SEP 2018

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय , मुंबई ४०० ०३२.

**विषय :** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१७-१८ चे ऑफलाईन प्राप्त झालेल्या प्रस्तावाबाबत.

**संदर्भ :** १) संचालनालयाचे समक्रमांक दि. ०६/०५/२०१६ चे पत्र.
२) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१७/एसएम-२, दि.०२/०४/२०१८.
३) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१७/एसएम-२, दि.१४/०८/२०१८.
४) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१६/प्र.क्र.१८/एसएम-२, दि.१४/०८/२०१८.
५) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१७/एसएम-२, दि.१५/०५/२०१८.
६) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.२१/०८/२०१८.
७) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.२७/०२/२०१८.
८) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.२२/०५/२०१८.
९) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१८/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.०३/०५/२०१८.
१०) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१८/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.०७/०८/२०१८.
११) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.२१/०९/२०१८.
१२) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.३०/१०/२०१८.
१३) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१७/एसएम-२, दि.११/०९/२०१८.
१४) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.१७/०५/२०१८.
१५) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.१९/०९/२०१८.
१६) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.०२/०१/२०१८.
१७) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.०२/०१/२०१८.
१८) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.०१/०३/२०१८.
१९) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.१८/०५/२०१८.
२० शासन पत्र क्र.एमआईएस-४७१८/प्र.क्र.१६/एसएम-२, दि. ३०/११/२०१८.
२१) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.२८/०८/२०१८.
२२) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.०४/०४/२०१८.
२३) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.२०/०४/२०१८.
२४) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१८/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.१८/०९/२०१८.
२५) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१८/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.२०/०८/२०१८.
२६) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.१८/०६/२०१८.

..२/-

Principal
Chaitanya International School
CBSE 1130899
A/P- Indori,Tal-Maval, Dist-Pune

२७) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.२४/०१/२०१८.
२८) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१८/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.०२/०२/२०१८.
२९) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१८/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.१८/०६/२०१८.
३०) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.२८/०८/२०१८.
३१) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.२१/०६/२०१८.
३२) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.१९/०७/२०१८.
३३) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.२१/०६/२०१८.
३४) शासन पत्र क्र.एमआईएस-४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२, दि.३०/०७/२०१८.

महोदय,

सदर विषयाचे कृपया अवलोकन व्हावे. संदर्भिय पत्र १ नुसार सदर विषयाच्या अनुसंगाने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळांकरिता सन २०१६-१७ या वर्षा साठी संचालनालयाकडे ऑनलाईन प्राप्त झालेले प्रस्ताव शिफारसीसह एकत्रितरित्या शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात आलेले होते.

संचालनालयास संदर्भ क्र. २ ते ३४ नुसार प्राप्त झालेले स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळांकरिताच्या प्रस्तावाबाबतची शासन पत्रे व त्यास अनुसरून प्राप्त झालेले एकूण ३३ ऑफलाईन प्रस्ताव विहित प्रपत्रात संचालनालयाच्या अभिप्रायासह यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया स्वीकृत व्हावेत , ही विनंती.

आपला विश्वासू,

(गंगाधर म्हमाणे)
शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक
म.रा. पुणे-१.

प्रत माहितीस्तव:
१) मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) श्री. रा.वि.कुडले , कार्यासन अधिकारी, (एस.एम.-२ ) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.

H.S. Khedkar
Principal
Chaitanya International School
At Post Indori,
Tal Maval Dist Pune

Principal
Chaitanya International School
CBSE 1130899
A/P- Indori,Tal-Maval, Dist-Pune

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | रायगड | रयत शिक्षण संस्था, सातारा | पद्मरत्न इंग्लिश मिडीयम स्कुल, पिरकोन, ता. उरण जि. रायगड. | न शाळा | ज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ १ ली ते १२ वी ) | इंग्रजी | शासन निर्णयार्थ सादर | १) ने दि. ३०/११/२०१५ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव दाखल केला नाही प्रस्तावासाठीचे आवश्यक चलन रु ५०००/- मुदती मध्ये दिनांक ०३/११/२०१५ रोजी भरणा केलेले आहे. २) संस्थेने मौज पिरकोन, ता. उरण जि. रायगड. येथील सर्वे नं ३४ मधील रयत शिक्षण संस्थेस अदा केलेल्या जागेचा नरगसंख्या नमुना चा उप अधिक्षक भुमी अभिलेख ता. उरण जि. रायगड यांचे दि. २२/०८/२०१७ च पत्राची प्रत जोडलेली आहे. ३) संस्थेने युनियन बँक ऑफ इंडीया ची रु. ५ लाखाची दि. १८/५/२०१८ ची ३ वर्षा साठी ची मुदतठेव पावती जोडली आहे. ४)संस्थेच्या प्रस्तावासोबतच्या अन्य कागदपत्रामध्ये सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० नुसार नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत व मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० नुसार नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत , संस्थेची घटना , संस्थेचे ३ वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल इ. नवीन शाळेसाठी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे जोडली आहेत. ५) सदर प्रस्ताव विहित मुदतीतील नाही. सबब सदर संस्थेचा नवीन प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ. १ ली ते१२ वी ) साठी चा ऑफलाईन प्रस्ताव शासन स्तरावर निर्णयार्थ सादर. |
| १० | पुणे | चैतन्य चॅरिटेबल फौंडेशन , इंदोरी, ता. मावळ, जि. पुणे. | चैतन्य प्रबोधिनी इंग्लिश स्कुल, इंदोरी, ता. मावळ, जि. पुणे. | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ. ६ वी ते १२ वी ) (सर्व शाखा ) | इंग्रजी | शासन निर्णयार्थ सादर | १) सदर संस्थेने दि. ३०/११/२०१५ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव दाखल केला नाही तथापी प्रस्तावासाठीचे आवश्यक चलन रु ५०००/- मुदतीनंतर दिनांक १७/०१/२०१८ रोजी भरणा केलेले आहे. २) शाळेस इ १ ली ते इ. ५ वी पर्यंतच्या वर्गास मान्यता असून आर.टी.ई निकष पुर्ण करित असल्या बाबत शिक्षणाधिकारी प्राथ. जि.प. पुणे यांचे दि. २६/११/२०१५ चे नमुना -२ प्रमाणपत्र जोडलेले आहे. ३) संस्थेने बँक ऑफ [महाराष्ट्र] ची रू. ७ लाखाची दि. ०६/०१/२०१७ व दि. २४/०१/२०१८ ची ची ३ वर्ष मुदतीची मुदतठेव पावती जोडली आहे. ४)संस्थेच्या प्रस्तावासोबतच्या अन्य कागदपत्रामध्ये सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० नुसार नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत व मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० नुसार नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत , संस्थेची घटना , संस्थेचे ३ वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल इ. नवीन शाळेसाठी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे जोडली आहेत. ५) सदर प्रस्ताव विहित मुदतीतील नाही. सबब सदर संस्थेचा दर्जावाढ उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ. ६ वी ते १२ वी ) साठी चा ऑफलाईन प्रस्ताव शासन स्तरावर निर्णयार्थ सादर. |

Principal
Chaitanya International School
CBSE 1130899
A/P- Indori,Tal-Maval, Dist-Pune

Principal
Chaitanya International School
At Post Indori,
Tal Maval Dist Pune